वर्ष-०७ | अंक-४९ | मुंबई, मंगळवार २६ ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर २०२१ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
बायकोने अबोला धरल्यामुळे खट्टू, पोलीस कॉन्स्टेबल पतीची विष पिऊन आत्महत्या

3 → 'नम्र विनंती, आम्हाला गांजाची शेती करु द्या', चंद्रपुरातील शेतकऱ्याची सरकारकडे विचित्र मागणी...

शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरणी साताऱ्याच्या पैलवानाला अटक ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## भ्रष्टाचाराचा काळोख दूर करा; प्रशासनात हो म्हणायला शिका!

### भावी सनदी अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांचा सल्ला



मुंबई: सनदी अधिकाऱ्यांना एकदाच कठीण परीक्षेला सामोरे जावे लागते. आम्हा राजकारण्यांना मात्र वारंवार कठीण परीक्षेला सामोरे जावे लागते. सरकारवर लोकांच्या अपेक्षांचा मोठा दबाव असतो. तरीही राजकारण्यांनी नाही आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी 'हो' म्हणायला शिकायला हवे असा मौलिक सल्ला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी भावी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिला.

शिव विद्या प्रबोधिनी बाळासाहेब ठाकरे आयएएस ॲकॅडमीतर्फे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२० मधील परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी परिवहन मंत्री अनिल परब, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत, मुख्यमंत्र्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आदी उपस्थित होते.

बाळासाहेब ठाकरे ॲकॅडमीचे विजय कदम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले गुणवंत महाराष्ट्राचे असतील किंवा अन्य कुठल्याही राज्यातले, पण या सर्वांनी देशाला आपला परिवार मानून प्रशासनात करिअर करायचे ठरविले आहे. आपली कुठेही नियुक्ती होवो पण भ्रष्टाचाराचा काळोख दूर करण्याचे आव्हान पेलण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या. असा गौरव होणे आमच्यासाठी भाग्याची गोष्ट असून खुद्द मुख्यमंत्र्यांनी आमचे कौतुक केले अशा शब्दांत गुणवंत विद्यार्थ्यांनी ...पान २ वर...

### अतिक्रमणे हटवल्याने महालक्ष्मी रेल्वे स्थानक उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा



मुंबई महापालिकेमार्फत केशवराव खाड्ये मार्ग, महालक्ष्मी रेल्वे स्थानक येथे रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या बांधकामाला अडथळा ठरणाऱ्या ४८ पैकी १६ बांधकामे पहिल्या टप्प्यात हटविण्यात आली आहेत. त्यामुळे महालक्ष्मी रेल्वे स्थानक येथील उड्डाणपुलाचा मार्ग मोकळा झाला आहे.

उपायुक्त विजय बालमवार, सहाय्यक आयुक्त मनीष वळंजू यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता श्री. शफी मोमीन, सहाय्यक अभियंता दीपक झुंजारे, दुय्यम अभियंता प्रवीण मुळूक, कनिष्ठ अभियंता दीनानाथ पालवी यांनी ही अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही पार पाडली. ...पान २ वर...

### मुंबईतल्या शाळांना अखेर 1 ते 20 नोव्हेंबरपर्यंत दिवाळीची सुट्टी जाहीर



कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर गेले दीड वर्षे बंद असलेल्या शाळांची ४ ऑक्टोबरला पुन्हा घंटा वाजली. तरीही कोरोनाचे सावट पुर्णपणे न गेल्यामुळे अनेक निर्बंध पाळून शाळांना सुरुवात झाली आहे. मात्र अवघ्या दहा दिवसांवर दिवाळीचा सण येऊन ...पान २ वर...

## ड्रग्स प्रकरणाची एसआयटी चौकशी करा : संजय राऊत



क्रूझ ड्रग्स प्रकरणातील पंच प्रभाकर साईल यांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आता शिवसेना नेते संजय राऊत यांनी सोमवारी या प्रकरणाचे धागेदोरे मुंबईच नव्हे तर दिल्लीपर्यंत पोहोचले असल्याचे सांगत या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली.

हे षडयंत्र आहे. पैशाचा खेळ आणि मनी लाँड्रिंग सुरू आहे. ईडीने याची चौकशी करावी. आत बसलेल्या व्यक्ती कोण आहेत? प्रभाकर साईल या प्रकरणातील साक्षीदार आहे. त्याचा बालही बाका होणार नाही, याचा विश्वास मी तुम्हाला देतो. त्याला त्रास देण्याचा प्रयत्न होईल. पण आम्ही त्याच्या पाठीशी आहोत, असे राऊत यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितले.

या प्रकरणाचे धागेदोरे मुंबई नव्हे तर दिल्लीपर्यंत आहेत. या मुलाने मोठे धाडस केलं. मी त्याच्या धाडसाचे कौतुक करतो. हीच खरी देशभक्ती आहे. आता अनेक गोष्टी बाहेर येतील. ...पान २ वर...

## ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली बेकायदेशीररीत्या जुगार खेळणाऱ्या दुकानावर पोलिसांनी टाकला छापा



दिनांक २३.१०.२०२१ रोजी, मिरारोड पूर्व याठिकाणी कौशेलेन्द्र राजेंद्र सिंग हा गाळा नं. ०५, मनी आर्केड बिल्डीग, रामदेव पार्क रोड, येथे बेकायदेशीररित्या ऑनलाईन लॉटरी जुगार खेळत व खेळवीत आहे अशी माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस. एस. पाटील यांना प्राप्त झाली . हि माहिती वरिष्ठांना कळवुन सदर ठिकाणी छापा कारवाई करण्यात आली असुन त्या दुकानातून ११५२०/- रु रोख व जुगाराचे इतर साहित्य असा एकुण ३०,०२०/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन ०१ लॉटरी चालक, ०६ जुगार खेळणारे इसम असे एकुण ०७ आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले व यांचा एक साथीदार फरार आहे असे एकूण ०८ जणांवर ...पान २ वर...

## ऑनलाईन वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या महिलेवर भाईंदर पोलिसांची कारवाई



वसई : वसईत दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वसई पश्चिम अंबाडी रोडवरील भाजी मार्केटसमोरील मध्यरात्री सव्वाबारा वाजताची ही दृश्यं आहेत. काय आहे प्रकरण? भर रस्त्यावर दोन गटांमध्ये ठोसा-बुक्क्यांनी हाणामारी झाली. मात्र ही मारामारी करणारे कोण आहेत, नेमकी का मारामारी करत आहेत, हे मात्र स्पष्ट झाले नाही. मात्र हाकेच्या अंतरावर माणिकपूर पोलीस ठाणे असतानाही मारामारी करणाऱ्यांची एवढी हिंमत वाढल्याने वसईत कायदा सुव्यस्था आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस आयुक्तालय स्थापन, मात्र गस्तीवर पोलीस नाही वाढत्या ...पान २ वर...

## अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई-मिरारोड येथे अंमली पदार्थ विकणाऱ्या आरोपींस अटक




दिनांक २१/१०/२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, मिरारोड (पुर्व), पश्चिम द्रुतगती महामार्गालगत असलेल्या सर्विस रोडवर प्युमा शोरुम समोर एक ईसम चरस हा अंमली पदार्थ करणाऱ्या विक्री करीता येणार आहे.

सदर मिळालेल्या बातमी वरिष्ठांना कळवुन त्यांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस पथकाने छापा कारवाई केली . सदर कारवाई दरम्यान एकुण ७२ ग्रॅम वजनाचा ५४,०००/-रु. किंमतीचा चरस नावाचा अंमली पदार्थ सेनवाद दिनमोहम्मद लखानी रा. वोवा, मुंबई मुळ रा. भावनगर, राज्य-गुजराथ यांच्या जवळ मिळुन आला. सदर अंमली पदार्थ (चरस) जप्त करण्यात आलेला असुन नमुद अंमली पदार्थ त्यास विक्रीकरीता पुरविणारे जय हरीश सोमय्या रा. मालाड (पश्चिम) मुंबई व मोहम्मद अनीस अबुबकर रहमान रा. वर्सेवा गाव, मुंबई मुळ रा. गोंडल, राज्य-गुजराथ यांना ताब्यात घेउन कारवाई करण्यात आली आहे. आरोपी जय हरीश सोमय्या हा अंमली पदार्थ तस्करी ...पान ४ वर...

## परमबीर सिंग यांचं 'गुजरात' कनेक्शन उघड, हवाला ऑपरेटरला अटक



मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्याभोवतीचा फास आता आवळत चालला आहे. गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खंडणीच्या गुन्ह्यातल्या एका आरोपीला पोलिसांनी रात्री गुजरातमधून अटक केली आहे. अल्पेश पटेल असं त्याचं नाव असून परमबीर सिंग यांनी त्याच्यामार्फत खंडणी उकळल्याचा आरोप आहे. त्यामुळे पोलिसांच्या हाती परमबीर सिंग यांच्याविरोधात मोठा पुरावा मिळाल्याचं मानलं जातं आहे.परमबीर सिंग यांच्याविरोधात महिन्याभरात दाखल झालेला हा चौथा गुन्हा आहे. व्यावसायिक विमल अग्रवाल यांनी परमबीर सिंग यांच्याविरोधात ही तक्रार दिली होती. विमल अग्रवाल हे बोहो आणि ओशिवरा इथे बीसीबी हा रेस्टॉरंट आणि बार भागीदारीमध्ये चालवतात. वाझेनं विमल यांच्याकडे पैशाची मागणी केली होती. परमबीर सिंग यांनी दररोज दोन कोटींच्या वसुलीचे लक्ष्य दिलं आहे, असं वाझेनं विमल यांना सांगितलं होतं. त्याच पार्श्वभूमीवर अग्रवाल यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात तक्रार केली. बार चालवायचा असेल, तर पैसे द्यावे लागतील असं वाझेनं परमबीर ...पान २ वर...

## 'फेसबुक फ्रेंड'च्या भेटीसाठी बंगळुरुहून औरंगाबादेत आली मैत्रीण, मित्राच्या घरीही पोहचली, पण... काय घडलं पुढे?

औरंगाबादः बंगळुरूमध्ये खासगी कंपनीत नोकरी करणाऱ्या एका तरुणीचा पतीशी काडीमोड झालेला आहे. गेल्या काही दिवसांपासून ती औरंगाबादमधील एका तरुणाच्या संपर्कात फेसबुकच्या माध्यमातून आली. सुरुवातीला लाइक्सच्या माध्यमातून सुरु झालेली ही मैत्री एवढी घट्ट झाली की ही मैत्रीण त्याला भेटण्यासाठी बंगळुरूहून थेट औरंगाबादेत आली. मात्र बंगळुरूहून निघालेल्या या मुलीचा पाठलाग करत तिचे नातेवाईकही औरंगाबादेत आले.नातेवाईकांनी दिली समज

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बंगळुरूहून आलेल्या तरुणीचा तिच्या पतीशी काडीमोड झालेला आहे. तिला एक मुलगी आहे. दरम्यान, ती एका खासगीत कंपनीत नोकरी करते. औरंगाबाद शहरातील मुकुंदवाडीतील एका तरुणाशी तिची मैत्री झाली. त्यांच्यातील चॅटिंग वाढल्यावर ते ऑनलाइन प्रेमात पडले. तरुणी चांगल्या




हुद्द्यावर काम करते. त्यामुळे तिला पगारही चांगला आहे. तिच्याच पैशांवर मुकुंदवाडीतील तरुणाने वाहन विकत घेतले. त्यांच्यातील मैत्री अधिक घट्ट झाल्यावर ती त्याला भेटायला मुलीला घेऊन थेट बंगळुरूहून औरंगाबादेत आली.

मुलीच्या मागे नातेवाईकही मुलाच्या घरी...

शनिवारी दुपारी 12 वाजेच्या सुमारास ही तरुणी तरुणाला भेटण्यासाठी बंगळुरूहून औरंगाबादेत आली. तिच्या पाठोपाठ तिचे नातेवाईकही औरंगाबादेत आले. नातेवाईक आपला पाठलाग करत आहेत, हे तिला कळलेच नाहीत. मुकुंदवाडीतील घरात घुसताच तरुणासह तिला नातेवाईकांनी पकडले. त्या तरुणाला आणि तरुणीला नातेवाईकांनी समजवून सांगितले. काही वेळाने दोघांचीही चांगलीच कानउघडणी केली. एवढंच नाही तर दोघांनाही मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात नेण्यात आले. आई व नातेवाईकांनी पोलिसांसमोर टाहो फोडला. यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांनी या तरुण-तरुणींची समजूत काढली. अखेर ही तरुणी नातेवाईकांसोबत बंगळुरूला परतली. अन्य घटनेत तरुणाला पहिल्या मजल्यावरून फेकले दरम्यान, शहरातील दुसऱ्या एका घटनेत , क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादानंतर दहा ते बारा जणांच्या टोळक्याने तरुणाला ...पान २ वर...

## 4 साथीदार, 4 महिने प्लॅनिंग, विम्याच्या 37 कोटींसाठी मनोरुग्णाचा खून, नगर हादरलं



अहमदनगर : 37 कोटी रुपयांचा इन्शुरन्स मिळवण्यासाठी चक्क एका मनोरुग्णाची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मनोरुग्णांचा खून करून स्वतःचा मृत्यू दखवण्यासाठी ही हत्या करण्यात आलीय. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर पोलिसांनी हा प्रकार उघडकीस आणला असून मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक करण्यात आलंय. 37 कोटी रुपये मिळावेत म्हणून खून पैसे मिळवण्यासाठी कोण काय करेल आणि कुठल्या पातळीवर जाईल याचा नेम नाही. अहमदनगरच्या अकोले तालुक्यातील राजूरमधील धामणगाव पाट या गावात धक्कादायक प्रकार घडला आहे. येथे विमा मिळवण्यासाठी नवनाथ आनप या मनोरुग्णाची हत्या करण्यात आली आहे. विम्याचे 37 कोटी रुपये मिळावेत म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार २६ ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर २०२१

# माहिती अधिकारी कायदा (RTI)" म्हणजे काय? त्याचा वापर कसा करावा? ! समजून घ्या...एडवोकेट अंकिता रा जयसवाल जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती, नागपुर हाई कोर्ट यांच्या कडून पुढील लेख मधे..

१५ जून २००५ रोजी माहिती अधिकार कायदा अर्थात RTI Act (Right TO Information) संसदेमध्ये मंजूर झाला आणि १२ ऑक्टोबर २००५ पासून हा अधिकार जनतेला बहाल करण्यात आला.

आजच्या लेखात आपण बघणार माहितीचा अधिकार बददल त्याआधी तुम्ही माझ्या फेसबुक पेज लीगल अवेयरनेस टॉक बाय एडवोकेट अंकिता आर जयसवाल ला भेट द्या, आनी माझ्या nyaykagyan.blogspot.com ला विजिट दया,

१)माहितीचा अधिकार कायद्यानुसार कोणीही नागरिक (केवळ भारतीय) सरकारी यंत्रणा किंवा कार्यालयांकडे त्याला हवी असलेली माहिती मागू शकतो आणि याबद्दलचा प्रतिसाद सरकारी यंत्रणेने किंवा कार्यालयाने संबंधित नागरिकाला ३० दिवसांच्या आता देणे बंधनकारक असते.

२)माहिती मिळवणाऱ्या नागरिकाला त्याला कोणत्या उद्देशाने माहिती हवी आहे याचे कारण देण्याची गरज नसते. भारतातील प्रत्येक राज्यामधील प्रत्येक नागरिक त्याला हवी ती माहिती या केंद्रीय माहिती अधिकार कायद्यांतर्गत मिळवू शकतो.

३)या कायद्यातील मूळ तरतुदीनुसार सरकारी यंत्रणांनी त्यांची माहिती संगणक प्रणालीद्वारे साठवून ठेवणे आवश्यक आहे आणि जनतेला माहित असावी अशी काही विशिष्ट माहिती, एखाद्या नागरिकाने विनंती केल्याशिवाय वेळोवेळी विविध माध्यमांतून जनतेपुढे मांडली पाहिजे.

४)माहिती अधिकार कायदा जरी नागरिकाला सर्व आवश्यक माहिती प्रदान करत असला तरी काही गोपनीय माहिती या कायद्याच्या कक्षेत येत नाही.

माहिती अधिकार कायद्याचा वापर करण्याची प्रक्रिया:

1)सर्वप्रथम नागरिकाने RTI वेबसाईटवरचा RTI Application Form भरावा. RTI Application Form कसा भरावा याचे तपशीलवार वर्णन RTI Application Form Guidlines या लिंकवर सापडते.

2)माहिती मिळवू इच्छिणाऱ्या नागरिकाने फॉर्म सोबत नाममात्र १० रुपये इतके शुल्क डिमांड ड्राफ्ट, चेक किंवा पोस्टाच्या माध्यमातून सरकारी यंत्रणेच्या अकाऊंट डिपार्टमेंटच्या नावे पाठवावे.

3)माहिती मिळवू इच्छिणाऱ्या नागरिकाने फॉर्म सोबत नाममात्र १० रुपये इतके शुल्क डिमांड ड्राफ्ट, चेक किंवा पोस्टाच्या माध्यमातून सरकारी यंत्रणेच्या अकाऊंट डिपार्टमेंटच्या नावे पाठवावे.

4)जर नागरिकाला हवी असलेली माहिती निर्धारित वेळेत पुरवली नाही तर नागरिकाने कोणतेही पैसे न भरता मोफत माहिती मिळू शकते. जर असा प्रकार घडला तर त्याबाबत तक्रार करून संबंधित व्यक्तींची चौकशी देखील केली जाते, कारण असा प्रकार म्हणजे माहिती लपवण्याचा किंवा न पुरवण्याचा प्रकार असू शकतो.

माहितीचा अधिकार कायदा १२ ऑक्टोबर, २००५ रोजी अंमलात आला. (१५ जुन, २००५ रोजी तयार झाल्यापासून १२० व्या दिवशी). मात्र या कायद्यातील काही तरतुदी ताबडतोब अंमलात आणण्यात आल्या उदा. सार्वजनिक प्राधिकरणांच्या (सरकारी कार्यालये) जबाबदाऱ्या, जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांची पदे, केंद्रिय माहिती आयोगाची स्थापना, राज्य माहिती आयोगाची स्थापना, कायद्यातून गुप्तचर आणि सुरक्षा संस्थांना वगळणे आणि कायद्यातील तरतूदी अंमलात आणण्यासाठी नियम बनविण्याचा अधिकार.

माहिती म्हणजे नक्की काय?

माहिती म्हणजे नोंदी, कागदपत्रे, शेरे, मेमो, ई-मेल्स, सल्ले, मते, प्रसिद्धीपत्रके, आदेश, परिपत्रके, रोजनिशी, करारनामा, अहवाल, कागद, उदाहरणे, नमुने या आणि अशा स्वरूपातील कोणतेही साहित्य तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमात असलेली कोणत्याही स्वरूपाची खासगी माहिती, जी प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणास जाणुन घेण्याचा अधिकार आहे.

१) काम, कागदपत्रे, नोंदी यांची तपासणी करणे

२) कागदपत्रे किंवा नोंदी यांच्या प्रमाणित प्रती मिळवणे तसेच त्यांची टिपणे काढणे.

३) साहित्याच्या प्रमाणित प्रती मिळवणे.

४) माहिती छापील प्रत, सीडी, फ्लॉपी, टेप्स, व्हिडिओ रेकॉर्डस् किंवा इतर कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मिळवणे.



जन माहिती अधिकारी म्हणजे कोण?

हे अधिकारी सर्व प्रशासकीय खात्यांत किंवा कार्यालयांत सार्वजनिक अधिकाऱ्यांद्वारे नेमण्यात आलेले असतात. ते नागरिकांना त्यांनी मागितलेल्या माहितीनुसार माहिती देण्याचे काम करतात. या कामासाठी जर ते सहाय्यकाची मदत घेत असतील तर अशा व्यक्तीसही जन माहिती अधिकारी म्हणुन वागवले जाते.

जनमाहिती अधिकाऱ्याची कर्तव्ये काय?

१) लोकांनी माहिती मिळवण्यासाठी केलेल्या विनंत्या हाताळणे आणि जी व्यक्ती विनंती लिखित स्वरूपात देऊ शकत नसेल अशा व्यक्तीस ती विनंती लिखित स्वरूपात लिहिण्यास मदत करणे.

२) जर मागविण्यात आलेली माहिती दुसऱ्या सरकारी अधिकाऱ्याच्या अखत्यारीत येत असेल तर ती विनंती पाच दिवसांच्या आत संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवणे आणि तसे अर्जदाराला ताबडतोब कळविणे.

३) जनमाहिती अधिकार्यास अर्जदाराने विनंती केल्यापासून शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत तीस दिवसांच्या आत योग्य ते शुल्क आकारून माहिती पुरविणे.

काही विशिष्ट अधिकारांतर्गत काही विशिष्ट माहिती नाकारली जाऊ शकते.

४) जर मागितलेली माहिती एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याशी किंवा स्वातंत्र्याशी संबंधित असेल तर ती माहिती अठ्ठेचाळीस तासांच्या आत पुरविणे बंधनकारक असते.

५)जर जनमाहिती अधिकारी दिलेल्या कालावधीत माहिती उपलब्ध करून देण्यास अपयशी ठरल्यास त्याने ती माहिती देण्यास नकार दिला असे समजले जावे.

ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी घ्यायची दक्षता

माहितीच्या अधिकारांतर्गत ऑनलाईन माहिती अधिकाराचा अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज दाखल करण्यासाठी पोर्टलचा वापर करता येईल. यासाठी लागणारे विहित शुल्क ऑनलाईन पद्धतीनं भरता येईल. तुम्ही मागवलेली माहिती अधिक असल्यास अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. ऑनलाईन अर्जामध्ये जे रकाने देण्यात आले आहेत त्यामध्ये तुम्ही 15 शब्दांमध्ये तुमची माहिती लिहू शकता. त्यापेक्षा जास्त मजकूर असल्यास पीडीएफ फाईल अपलोड करावी लागेल

अर्जाचं शुल्क

ऑनलाईन पद्धतीचा वापर करुन माहिती मागवण्यासाठी 10 रुपये शुल्क भरावे लागेल. तर, अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असल्यास त्यांना माहिती मागवण्यासाठी शुल्क भरावं लागणार नाही.

अर्जाचं शुल्क भरण्यासाठी 1) इंटरनेट बँकींग 2) एटीएम-कम-डेबिट कार्ड 3) क्रेडिट कार्ड (मास्टर्स/व्हीसा) याचा वापर करता येईल

ऑनलाईन अर्ज कसा करणार?

महाराष्ट्र शासनाच्या माहिती अधिकार कायदा ऑनलाईन अर्ज पोर्टला भेट द्या. त्यानंतर वेबसाईटवर ऑनलाईन माहितीचा अधिकार पोर्टल वापरण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्या वाचून समजून घ्या त्यानंतर मार्गदर्शक सूचना वाचल्याचं मान्य करून अर्ज दाखल करण्याच्या बटनवर क्लिक करा. यानंतर तुम्हाला कोणत्या विभागाची माहिती हवी आहे तो निवडावा लागेल.

अर्जदाराचे नाव, ईमेल आयडी, मोबाईल नंबर, पत्ता, अर्ज दाखल करण्याचं कारण, अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे का ते निवडल्यानंतर हवी असलेल्या माहितीसंबंधी तपशील माहिती अधिकार विनंती अर्ज मजकूर नमुन्यात लिहावा. त्यानंतर तुम्हाला अर्ज सबमिट करता येईल.

त्यानंतर विहीत शुल्क भरुन तुम्ही हवी असलेली माहिती मिळवू शकता.

महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवर कोणत्या विभागांची माहिती मागविता येते ?

मंत्रालयातील विविध विभाग, पोलीस आयुक्त कार्यालयं, महापालिका, जिल्हा परिषद, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा पोलीस कार्यालय, तहसील कार्यालय आदी विभागांकडून माहिती मागवता येईल.

अशा प्रकारे माहितीचा अधीकर हा लेख जागरूकतेसाठी मी आपण सर्वांसाठी लिहिलेला आहे आपण सर्वांना आवडल्यास नक्की शेअर करा व कमेंट द्वारे आपली प्रतिक्रिया कळवा!

***नोट, लेख कोणीही कॉपी करू नये!***

## बायकोने अबोला धरल्यामुळे खट्टू, पोलीस कॉन्स्टेबल पतीची विष पिऊन आत्महत्या

जयपूर : राजस्थानच्या झालावाड शहरात एका पोलीस कॉन्स्टेबलने विष पिऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. करवा चौथच्या मुहूर्तावर त्याच्या पत्नीने अबोला धरला होता, याच कारणावरुन त्याने आयुष्य संपवल्याची चर्चा आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी हवालदाराला झालावाड येथील रुग्णालयात नेले, मात्र तिथे त्याला मृत घोषित करण्यात आले. उत्तर भारतीय समाजात करवा चौथच्या दिवशी पत्नी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी दिवसभर उपवास ठेवते. चंद्रोदयानंतर पतीचे दर्शन घेऊन पत्नी उपवास सोडते. मात्र याच दिवशी राजस्थानमधील संबंधित पती-पत्नीत अबोला आला. त्यानंतर पतीने आयुष्य संपवलं. काय आहे प्रकरण? झालावाड शहरातील इंदिरा कॉलनीत राहणारे पोलीस हवालदार हनुमान सिंग यांनी रविवारी सकाळी विष प्राशन करून आत्महत्या केली. करवा चौथच्या निमित्ताने पत्नी रागवल्याने त्यांनी आत्महत्या केल्याची प्रथमदर्शनी माहिती समोर आली आहे.

## परमबीर सिंग यांचं

पृष्ठ १ वरुन

यांच्या सांगण्यावरुन धमकावलं होतं. जानेवारी २०२० ते मार्च २०२१ या कालावधीत ९ लाख रुपये रोख, सॅमसंग कंपनीचे दोन महागडे मोबाइल घेतल्याचा आरोप अग्रवाल यांनी तक्रारीत केला. त्यावरून पोलिसांनी परमबीर सिंह, सचिन वाझे याच्यासह सुमित सिंह उर्फ चिंटू, अल्पेश पटेल, विनय सिंह उर्फ बबलू आणि रियाज भाटी यांच्या विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल केला.खंडणीच्या या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान हवाला ऑपरेटर अल्पेश पटेल याचा सहभाग निश्चित होताच पोलिसांनी त्याला अटक केली. पटेल याला गुजरातच्या मेहसाणा रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेण्यात आलं. पटेल याच्या चौकशीतून बरीच माहिती आणि पुरावे हाती लागण्याची शक्यता आहे त्यामुळे सिंह यांच्या अडचणी वाढणार आहेत. याप्रकरणात गुन्हे शाखेचे अधिकारी तुरुंगात असलेल्या सचिन वाझेचा चौकशीसाठी ताबा मिळावा म्हणून कोर्टात जाण्याचीही शक्यता आहे, अशीही माहिती मिळत आहे.

## 'फेसबुक फ्रेंड'च्या भेटीसाठी

पृष्ठ १ वरुन

इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून खाली फेकण्याचा प्रयत्न करत गंभीर मारहाण केली. ही घटना 19 ऑक्टोबर रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास जालना रोडवरील अपना बाजार परिसरात घडली. याप्रकरणी टोळक्याविरुद्ध 23 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. संदेश देवेंद्र गंगवाल (28, रा. राठी संसार, रो-हाऊस, जाधववाडी, सनी सेंटर) असे मारहाणीतील जखमीचे नाव आहे. संदेश गंगवाल 19 ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास जालना रोडवरील अपना बाजार येथील यमी-यमी चायनीज स्टॉल येथे गेले होते. त्यावेळी गंगवाल व याग्निक पटेल यांच्यात क्षुल्लक कारणावरून वाद झाला. वादानंतर याग्निक पटेल यांनी आठ ते दहा जणांना बोलावून गंगवाल यांना शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. तसेच कार्यालयातील काचेवर ढकलले. वाद वाढत गेल्यानंतर टोळक्याने त्यांना इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून खाली फेकून देण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने गंगवाल यांनी गॅलरीचे ग्रील पकडून ठेवल्यामुळे त्यांचा जीव वाचला. मारहाणीत त्यांच्या डोक्याला गंभीर जखम होऊन टाके पडले. याप्रकरणी याग्निक पटेल यांच्यासह आठ ते दहा जणांविरुद्ध जवाहरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपनिरीक्षक राऊत करत आहेत. मोबाइल, स्मार्ट वॉच हिसकावली.. मारहाणी दरम्यान टोळक्यातील आरोपींनी गंगवाल यांचा मोबाइल आणि स्मार्ट वॉच हिसकावल्याचे त्यांनी सांगितले. जवाहरनगर पोलिसांनी मोबाइल आणि वॉच गहाळ झाले असे सांगा, हिसकावले असे सांगू नका असे सांगितले होते. गंगवाल यांचा याला विरोध होता. या प्रकरणात काही राजकीय मंडळींनी देखील फोनद्वारे धमकी दिल्याचे गंगवाल यांनी सांगितले. अखेर शनिवारी रात्री पोलिसांचेच म्हणणे खरे करत तसा जबाब नोंदवला गेल्याचे स्पष्ट होत आहे.

पृष्ठ १ वरुन

## मुंबईतल्या शाळांना अखेर 1 ते 20

ठेपला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली. परंतु मुंबईतील शाळांना अजूनही दिवाळीची सुट्टी जाहीर न झाल्यामुळे मुंबईतील विद्यार्थी आणि पालक संभ्रमात होते. मात्र आता मुंबईतील शाळांना दिवाळीची सुट्टी अखेर जाहीर झाली आहे. शिक्षक निरीक्षकांनी मुंबईतल्या शाळांना अखेर १ ते २० नोव्हेंबरपर्यंत दिवाळीची सुट्टी जाहीर केली आहे. शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक अनिल बोरनारे यांनी २० ऑक्टोबर रोजी मुंबईचे शिक्षण उपसंचालक तसेच बृहन्मुंबई उत्तर, पश्चिम व दक्षिण विभाग शिक्षण निरीक्षकांकडे दिवाळी सुट्टी जाहीर करण्याबाबत निवेदन पाठविले होते.आज अखेर यासंदर्भातील आदेश शिक्षण निरीक्षक कार्यालयांनी शाळांच्या मुख्याध्यापकांना दिल्याने सुट्ट्याबाबतचा शिक्षक,पालक आणि विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर झाला आहे.कोरोना काळात अनेक शिक्षकही कोविड यौध्दा म्हणून कार्यरत होते. त्यामुळे आपल्या मूळ गावी जाऊ शकले नाहीत. सुट्ट्या जाहीर न झाल्यामुळे यावर्षी देखील गावी जायला मिळेल की नाही, याबाबत अनेक शिक्षकही संभ्रमित होते.

## अतिक्रमणे हटवल्याने महालक्ष्मी रेल्वे

मुंबई महापालिकेमार्फत संत गाडगे महाराज चौक (सातरस्ता) येथून केशवराव खाड्ये मार्गावर हाजीअलीच्या दिशेने केबल स्टेअड पद्धतीने पूल बांधण्यात येणार आहे. हा पूल सध्याच्या महालक्ष्मी पुलावरील वाहतूक कमी करण्यासाठी मदतकारक ठरणार आहे. तसेच सध्या काम सुरु असलेल्या कोस्टल रोडवरून येणारी आणि दक्षिण मध्य मुंबईकडे जाणारी वाहतुकही सुरळीत होणार आहे.

हा उड्डाणपूल महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळ रेल्वेमार्गावर बांधण्यात येणार आहे. मात्र या उड्डाण पुलाच्या बांधकामामध्ये या परिसरातील ४८ बांधकामे बाधित होत आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील १६ बांधकामे हटविण्याचे काम सोमवारी पार पाडण्यात आले. आता या बाधित व पात्र झोपडीधारकांचे 'ई' विभाग कार्यालयामार्फत कायदेशीररित्या पर्यायी जागेत पुनर्वसन करण्यात आले आहे. ही १६ अतिक्रमणे काढल्यामुळे उड्डाणपुलाच्या पहिल्या टप्प्यातील बांधकामाचा मार्ग मोकळा झालेला आहे.

पुढील अतिक्रमणे काढण्यासाठी, बाधितांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून येत्या काही दिवसांत ती पूर्ण करुन उर्वरित अतिक्रमणे देखील हटविण्यात येणार आहेत.

## ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली

मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-१), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पो. हवा. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, मपोना वैष्णवी यंबर, मपोशि सुप्रिया तिवले, चा. पोना गावडे सर्व नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर तसेच पोनि. संतोष एस. चौधरी, सपोउनि. बी. डी. चित्ते, सपोउनि. पी.व्ही निकम, पोहवा. बी.एम. पवार, आर.एन. पदमने, मपोहवा. एस. एस. डोईफोडे, पोना. किणी, एम.पी. शेटटे, चालक पोना. एस. व्ही. पागी सर्व नेम. अ.मा.व.शा. वसई यांनी केली आहे.

## ड्रग्स प्रकरणाची एसआयटी

मलिक यांनी काही गोष्टी बाहेर आणल्या, असेही राऊत म्हणाले. भाजपने या संपूर्ण प्रकरणाच्या सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. त्यावरही राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. सीबीआयची चौकशी व्हावी. जरुर व्हावी. तुम्ही म्हणताय ना चौकशी करा तर करा. अजून दहा व्हिडीओ मी तुम्हाला देतो करा चौकशी, असे आव्हानच राऊत यांनी दिले. किरण गोसावी, परमबीर सिंग कुठे आहेत हे भाजपला माहीत असेल. महाराष्ट्राला बदनाम करण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही. सॅम डिसोजाचा संदर्भ मनी लॉन्ड्रिंगमध्ये येतो.

## ऑनलाईन वेश्या व्यवसाय

लोकसंख्येनुसार गुन्हेगारी रोखण्यासाठी मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय स्थापन होऊन सव्वा वर्ष उलटले आहे. तरीही एकही पोलीस कर्मचारी रात्रीचा गस्तीवर नाही. त्यामुळेच वसई विरारची सुरक्षा सध्या रामभरोसेच चालू आहे की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. अंबरनाथमध्ये भररस्त्यात मद्यधुंद तरुणीचा धिंगाणा दुसरीकडे, एका मद्यधुंद तरुणीने भररस्त्यात धिंगाणा घातल्याचा प्रकार अंबरनाथमध्ये घडला आहे. या प्रकाराचा व्हिडीओ सुद्धा व्हायरल झाला आहे. तरुणीने रस्त्यावरून जाणाऱ्या काही जणांना शिवीगाळ केली. अखेर तासाभराच्या तमाशानंतर ही तरुणी तिच्या मित्रासोबत निघून गेली. नेमकं काय घडलं? अंबरनाथ पूर्व भागातील गोविंद पूल ते लोकनगरी या दरम्यान झालेल्या नवीन रस्त्यावर हा प्रकार घडला. एक तरुण आपल्या परिवारासह या रस्त्यावरून कारने जात होता. यावेळी अचानक एक तरुणी गाडीसमोर आली आणि गाडीवर हात आपटत शिवीगाळ करू लागली. त्यामुळे या तरुणाने तिला समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र तरुणी पूर्णपणे नशेत होती. रस्त्यावरून जाणाऱ्यांना शिवीगाळ

यानंतर या तरुणीने रस्त्यावरून जाणाऱ्या आणखी काही जणांना शिवीगाळ केली. अखेर तासाभराच्या तमाशानंतर ही तरुणी तिच्या मित्रासोबत निघून गेली. मात्र हा संपूर्ण धिंगाणा मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. हा प्रकार तासभर सुरु असतानाही पोलीस मात्र तरुणी निघून गेल्यानंतर घटनास्थळी दाखल झाले आणि रिकाम्या हाती परतले.

## अंमली पदार्थ विरोधी कक्षाची

करणारा आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार आहे. नमुद आरोपीविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाण्याकडुन चालु आहे. सदरची कारवाई श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, सहा. पोलीस निरीक्षक, विलास कुटे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेमभरोसा सेल, पो.हवा. धनाजी इंगळे, पोना. पवन पाटील, विनोद राउत, पोशि. अजय यादव, विष्णुदेव घरबुडे यांनी केली आहे.

## 4 साथीदार, 4 महिने प्लॅनिंग,

मागील वीस वर्षापासून अमेरिकेत स्वयंपाकी म्हणून नोकरी करणाऱ्या प्रभाकर वाकचौरे याने हा हत्येचा कट रचला होता. खून करण्यासाठी 4 महिने नियोजन मिळालेल्या माहितीनुसार प्रभाकरने 2013 साली बायकोचा 10 लाख डॉलरचा आणि स्वतःचा 50 लाख डॉलरचा अमेरिकेत ऑल स्टेट इन्श्यूरन्स कंपनीकडे विमा काढला होता. या विम्याचा क्लेम मिळावा यासाठी प्रभाकर आपल्या गावी आला. आपल्या 4 साथीदाराच्या मदतीने 4 महिने नियोजन करून त्याने हत्येचा कट रचला. विमा कंपनीला आला शंशय प्रभाकरने एका मनोरुग्ण व्यक्तीचा खून करण्यासाठी सापाची मदत घेतली. त्याने विषारी सापाच्या दंशाने मनोरुग्णांचा खून करून स्वतःचा मृत्यू झाल्याचे पुरावे तयार केले. हे पुरावे आणि कागदपत्रे वाकचौरे याने विमा कंपनीकडे सादर केले. मात्र याची पडताळणी करताना काहीतरी गडबड असल्याचा संशय विमा कंपनीला आला. त्यानंतर विमा कंपनीने राजूर पोलिसांची मदत घेतली.

आरोपींनी गुन्हा केला कबूल

राजूर पोलिसांनी तपास केल्यानंतर धक्कादायक सत्य समोर आलं. प्रभाकर वाघचौरे याचा मृत्यू झाला नसून तो जिवंत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी प्रभाकरला ताब्यात घेऊन चौकशी केली. त्याच्या 4 साथीदारांनी नवनाथ अनप या मनोरुग्णाची विषारी सापाच्या दंशाने हत्या केल्याची कबुली दिली आहे. प्रभाकर वाकचौरे याने विम्याचे 37 कोटी रुपये मिळवण्यासाठी एका मनोरुग्ण व्यक्तीची हत्या केली. तसेच स्वत:चा मृत्यू झाल्याचा बनाव केला. या घटनेमुळे अहमदनगर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार २६ ऑक्टोबर ते ०१ नोव्हेंबर २०२१




## संपादकीय...

# सगळेच सहभागी, बोलणार कोण?

मराठवाडा मुक्तिसंग्रामाशी तुमचं तारुण्य जोडलेलं आहे. त्यावेळचा सगळा संघर्ष आणि आजचं वास्तव तुम्ही कसं जोखता? मराठवाडा निजामी राज्यात असताना तत्कालीन तरुण आणि प्रौढांसमोर जीवनाची दोन प्रयोजनं होती. पहिलं, निजामाच्या सरंजामशाही सत्तेतून बाहेर पडायचं. दुसरं होतं स्वातंत्र्य मिळवायचं. हे स्वातंत्र्य नुसतं राजकीय नव्हतं, तर भाषिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठीसुद्धा हा संघर्ष होता.मराठवाड्याचा स्वातंत्र्यसंग्राम दुहेरी कसा होता हे उर्वरित भागांना कळणं कठीण आहे. स्वातंत्र्यासाठी उत्सुक अन्य बेळगाव, नाशिक अशा जिल्ह्यांमध्ये सरकारी कामं करताना तुम्ही मराठीत अर्ज दिला तर चालत असे. शिक्षणाचं माध्यम मराठी, कन्नड होतं. गरजेप्रमाणं हव्या त्या भाषेत शाळा शिकता येत होती. मराठी गाणं म्हणण्याची त्यांना परवानगी होती. स्वातंत्र्यपूर्व मराठवाड्यात साधी साहित्यसंस्था काढायला परवानगी नव्हती. स्वतंत्र अभिव्यक्तीला परवानगी नव्हती. मराठवाडा मुक्ती लढ्याच्या काळात प्रेरणाच वेगळ्या होत्या. तो लढा हेच ध्येय. त्याव्यतिरिक्त बाकी आव्हानं समोर नव्हती. आजच्या तरुणांसमोर असणाऱ्या संघर्षाशी त्याची तुलनाच करता येणार नाही. आज राजकारण विविध स्वरूपाच्या इतर मूल्यांनी गढूळ झालं आहे. निवडणूक जिंकण्यासाठी द्वेषाची अधिकाधिक पेरणी करून पीक कसं काढता येईल याचीच काळजी सर्व राजकारण्यांनाच असते. यात सहभागी सगळेच त्यामुळं बोलायचं कुणीच नाही अशी परिस्थिती आहे. विधिमंडळ, लोकसभांमधील भाषणांचा दर्जा घसरतो आहे. लोकांचे प्रश्न मांडणारी चर्चा तिथं दिसत नाही. ही परिस्थिती फार गंभीर आहे. सगळ्यांना सगळं कळतं; पण कुणीच काही करू शकत नाही. सामान्य माणसाच्या मनात यातून एक प्रकारची हतबलता ठळक होते आहे. ही हतबलता आज ना उद्या, समाजात अल्पसंख्येनं उरलेल्यांना, आपली इच्छा आणि भूमिका शिल्लक ठेवू पाहणाऱ्यांना कधी ग्रासून टाकेल माहिती नाही! राजकीय हस्तक्षेप वाढल्यामुळं न्यायसंस्थेचं स्वायत्त रूप धोक्यात येण्याची शक्यता वाटते का? न्यायसंस्थेच्या कामकाजात अजून तरी हस्तक्षेप झाला नाही, पण प्रयत्न दररोज सुरू आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी न्यायाधीशांच्या नेमणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता, ती परिस्थिती आजही फार बदललेली नाही. मात्र, सरकार व न्यायसंस्था दोघांवर जाणत्या समाजाचा नैतिक दबाव व वजन असेल तर दोघेही उत्तम काम करू शकतील. त्यासाठी दीर्घकाळ व सातत्यपूर्ण प्रयत्न करावे लागतील, माणसं चांगली असू शकतात यावर विश्वास ठेवावा लागेल. न्यायसंस्थेविषयी मला आदर आहे असं एका बाजूनं म्हणून लगेच तिला फाटा देऊन कामं कशी साधता येतील याचा प्रयत्न करीत राहायचा असा दुटप्पीपणा आपण करतो. स्वत:च्या वर्तनाकडेही चिकित्सकपणे बघावं लागेल. मराठी भाषा सल्लागार समितीत तुम्ही काम केलं होतं. भाषा उखडली जाऊ नये म्हणून काय करावं असं वाटतं? आपण भाषेच्या अधोगतीच्या दिशेनं फार पूर्वीच प्रवास सुरू केला आहे. 'भाषा कधीही मरणार नाही!' अशी विधानं टाळ्यांसाठी ठीक आहेत. मुळात आपले सामाजिक, राजकीय, व्यापार उद्योगातले व्यवहार किती टक्के मराठीत चालतात व किती टक्के इतर भाषांत, याचा हिशेब आपण मांडू शकतोच ना? अहिराणी, कोकणी अशांसारख्या बोली बोलणाऱ्या समूहांची संस्कृती टिकवीत त्यांना मराठीही उत्तम रीतीनं शिकता यावी याची व्यवस्था आपल्याला करता येईल का? मराठी शाळा बंद का होतात या मूळ प्रश्नाकडे वळून उपाययोजना न करता भाषेविषयीचे वेगळेच मुद्दे चर्चेत आणण्यानं दिशाच बदलते. शिक्षण देणाऱ्या पायाभूत व्यवस्थेबाबतीत सशक्त योजना, धोरणं आखणं व अमलात आणणं जरूरीचं आहे. यासाठी प्रामाणिक शासन, प्रामाणिक लोकप्रतिनिधी व प्रामाणिक कर्मचारी एकत्र यावे लागतील. संवाद सुरू व्हावा लागेल.कोविड काळातील अस्वस्थतेकडं तुम्ही कसं पाहिलंत? मृत्यूचं भय माणसासमोर असतंच, पण कोरोनाविषयीची जी माहिती व आकडेवारी समोर येत राहिली त्यानं ती भीती प्रखर झाली. प्रकर्षानं समोर आली. ज्यांना माणसाशी, माणसासारखं, माणसामध्ये जगण्याची इच्छा आहे त्यांच्या जगण्याला मोठाच अडथळा निर्माण झाला. ज्यांना एकलकोंडं आयुष्य आवडतं, कुणाशी विशेष संबंध नसतो अशी माणसं समाजात फार थोडी असतात. बाकीची सर्व माणसं ही समाजात एकमेकाला धरून असतात. सुख-दु:खात वाटेकरी हवा अशी माणसांची इच्छा असते. कोरोनाच्या नियमांमुळे त्यात बाधा आली. माझ्या पिढीतले लोक समाजात एकत्र जगणंच शिकलेले आहेत. गावं लहान होती, भेटीगाठी होत होत्या.

# तांदूळ निवडता निवडता..

आपल्याकडे अनेक ठिकाणी सरकारी मंजुरीआधीच जनुकीय सुधारित कापसाची लागवड झाल्याचे आढळले होते. तसेच काही तांदळाबाबत झाले नसेलच याची हमी कोण देणार? आणि दिली तरी त्यावर विश्वास कोण ठेवणार?

काही वर्षांपूर्वी भारतातील द्राक्षांनी जे अनुभवले ते आता आपले तांदूळ अनुभवत आहेत. यातील दुर्दैवाचा भाग म्हणजे त्या वेळी युरोपीय देशांची शिक्षा अनुभवणारी द्राक्षे आपल्या नाशकातील होती आणि आताही युरोपचा राग सहन करावा लागणारा तांदूळ अकोल्यातील व्यापाऱ्यांकडून गेलेला आहे. आपल्याकडून युरोपात गेलेल्या द्राक्षांत कीटकनाशकांचे अंश आढळल्याने हलकल्लोळ उडाला होता आणि ही प्रचंड द्राक्ष मागणी रद्द होण्याची वेळ आली होती. आता तसाच काहीसा प्रसंग भारतातून युरोपात विकल्या गेलेल्या तांदूळसाठय़ाबाबत निर्माण झाला असून तब्बल ६५ हजार कोटी रुपयांची तांदळाची निर्यात बाजारपेठ त्यातून संकटात सापडली आहे. या संकटाचा आकार आणि मराठी मातीत त्याची असलेली मुळे लक्षात घेता या विषयाचा वेध घ्यायला हवा.हे प्रकरण साधारण ऑगस्टपासून सुरू आहे. म्हणजे त्या वेळी ते उघडकीस आले. झाले ते असे की युरोपीय बाजारपेठांत भारतातून निर्यात झालेल्या ५०० टन तांदळास जनुकीय सुधारित (जेनेटिकली मॉडिफाइड, जीएम व्हरायटी) वाणाची बाधा झाली असल्याचा संशय फ्रान्समध्ये प्रथम घेतला गेला. भारतातून गेलेल्या या तांदळाची पिठी करून स्थानिक कंपन्यांनी ती युरोपातील विविध देशांत विविध उत्पादनांसाठी विकली. येथपर्यंत सर्व ठीक. त्या प्रांतातील पद्धतीप्रमाणे युरोपीय संघाच्या अन्नसुरक्षाविषयक समितीने या पिठीची नकळत चाचणी घेतली असता तीत तांदळाच्या शुद्ध रूपाऐवजी जनुकीय सुधारित तांदळाच्या वाणाचे अंश आढळले. वास्तविक युरोपियनांस जनुकीय सुधारित अन्नाचे वावडे आहे असे अजिबात नाही. पण या प्रकरणात ही कथित जनुकीय बाधा डोळ्यावर आली कारण अलीकडच्या खुळानुसार सदर तांदळाची पिठी ही नैसर्गिक (ऑर्गेनिक), रासायनिक खतेविरहित तांदळाची आहे, अशी जाहिरात केली गेली होती. म्हणजे, मांसाहारी पदार्थ चालतात की नाही हा मुद्दा नाही, तर शाकाहारी पदार्थ असल्याचे सांगितल्यावर त्यात मांसाचा तुकडा मिळावा तसे हे पाप.



म्हणजे जनुकीय सुधारित वाण नाही, असे सांगून त्यात जनुकीय बाधा असल्याचे आढळल्याने फ्रान्समध्ये पहिल्यांदा त्यावर आक्षेप घेतले गेले आणि त्यानंतर अन्य युरोपीय देशांस तसा संदेश गेल्यावर त्याबाबत सर्वांनीच हरकती नोंदवल्या. जर्मनी ते ऑस्ट्रिया अशा डझनभर देशांनी यानंतर भारतीय तांदळाबाबत धोक्याचे बावटे फडकावले. ते पाहून अमेरिकी कंपन्यांची पण या तांदळाबाबत नकारघंटा वाजली. पण प्रकरण तेथेच थांबले नाही. या देशांनी सदर तांदळाची मागणी रद्द करण्याचे पाऊल उचलल्याने यातून मोठेच आव्हान निर्माण झाले आहे.

सदर प्रसंग युरोपीय व्यापार संघ आणि तत्सम संघटनांनी भारत सरकारच्या वाणिज्य खात्यासमोर मांडल्यानंतर आपल्याही सरकारला खडबडून जाग आली. त्यानंतर हे घडले कसे, याचा शोध सुरू झाला. या संपूर्ण साठय़ास तटस्थ यंत्रणेकडून 'जनुकीय सुधारित वाणमुक्त' असे प्रमाणपत्र देण्यात आले होते. तरीही यात जनुकीय बाधा आढळल्याने एकच खळबळ उडाली.त्यामुळे याच्या मुळाशी जाऊन शोध सुरू झाला आणि त्यात सदर तांदूळसाठा महाराष्ट्राच्या अकोल्यातील कोणा 'ओमप्रकाश शिवप्रकाश' या तांदूळ व्यापाऱ्याकडून निर्यात झाल्याचे आढळले.तथापि या तांदळात स्थानिक पातळीवर जनुकीय बाधा झालेली नसल्याचा ठाम निर्वाळा येथील यंत्रणांकडून मिळाल्यानंतर केंद्राने त्याप्रमाणे युरोपीय संघटनांसमोर आपली बाजू मांडली. ती अर्थातच युरोपीय यंत्रणांनी अद्याप स्वीकारलेली नाही. त्यांचा वहीम भारतीय व्यवस्थेवर असून त्यामुळे आपली तब्बल ६५ हजार कोटी रुपयांची तांदूळ निर्यात संकटात आली आहे. आपले म्हणणे असे की या तांदळाची पिठी करताना त्यात भेसळ झाली असावी. 'भारतात जनुकीय सुधारित तांदूळ वाणाच्या लागवडीस पूर्ण मनाई आहे. तेव्हा भारतातून ही मिसळ होण्याची शक्यताच नाही,' हा आपला युक्तिवाद. तो युरोपीय संघास मान्य नाही. तेथील यंत्रणांनी जनुकीय भेसळीतील नेमके जनुकच हुडकून काढले असून भारतास त्याचे तपशील पुरवले आहेत. यानंतर भारत सरकारने अधिक चौकशीसाठी हे सारे प्रकरण 'इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूट'कडे सुपूर्द केले असून विविध यंत्रणांकडून आता त्याचा पाठपुरावा सुरू आहे. त्याच वेळी युरोपीय संघानेही तेथील स्थानिक पातळीवर या साऱ्याची चौकशी करावी असा आपला आग्रह आहे. तो रास्त ठरतो. तेव्हा या साऱ्याच्या चौकशीअंती जे काही आणि जेव्हा केव्हा निघेल ते निघेल. तोपर्यंत काही मुद्दय़ांस सामोरे जाण्याचा प्रामाणिकपणा आपण दाखवायला हवा.त्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा जनुकीय वाणास 'भारतात बंदी' असल्याचा आपला दावा. या देशातील डावे असोत वा उजवे. दोघांनीही जनुकीय सुधारित तंत्रज्ञानाच्या वापरास तत्त्वत: विरोध केला आहे. काही अतिरेकी पर्यावरणवाद्यांची त्यास साथ असल्याने जनुकीय वाण म्हणजे काही भयानक संकट असे प्रतिमान निर्माण झाले. या दोन्हीकडच्यांचा शास्त्रावर विश्वास नाही आणि आपले समज म्हणजेच शास्त्र असे त्यांचे वर्तन असते. तेव्हा सरकारचा दावा खरा मानल्यास भारतात मोठय़ा प्रमाणावर जनुकीय अभियांत्रिकी सुधारित कापसाच्या वाणाचा इतका प्रसार कसा काय? वास्तविक भारत सरकारने जनुकीय सुधारित वांग्याच्या चाचण्यांसही नकार दिलेला आहे. म्हणजे अधिकृतपणे या अशा वांग्यांची लागवड आपल्याकडे नाही. पण भारतीयांची विख्यात जुगाडवृत्ती लक्षात घेतल्यास चोरून असे काही होतच नसेल याची हमी आपण देऊ शकतो काय? याबाबत आपला लौकिक संशयास्पद म्हणावा असा आहे. दुसरे असे की सरकारी पातळीवर याबाबतच्या समित्यांकडून जनुकीय वाणाच्या चाचण्या वा प्रयोग आपल्याकडे सुरू आहेत. या प्रयोगांचे निष्कर्ष सरकारदरबारी सादर होऊन त्यावर निर्णय होण्याची प्रक्रिया आपल्याकडे अनादी-अनंत अशीच असते. त्यामुळे अशा जनुकीय वाणांस थेट बाजारात वाट फुटतच नाही, असे आपण म्हणू शकत नाही. कापूस हे त्याचे ज्वलंत उदाहरण. अनेक ठिकाणी आपल्याकडे सरकारी मंजुरीआधीच जनुकीय सुधारित कापसाची लागवड झाल्याचे आढळले होते. तसेच काही तांदळाबाबत झाले नसेलच याची हमी कोण देणार? आणि दिली तरी त्यावर विश्वास कोण ठेवणार?

अशा वेळी शुद्ध विज्ञानवादी दृष्टिकोनाचा अंगीकार करीत जनुकीय सुधारित बियाण्यांस अधिकृत मान्यता देण्याचा शहाणपणा आपण दाखवणार का, हा यातील कळीचा प्रश्न. विज्ञानावरील आपली गाढ सरकारी श्रद्धा लक्षात घेता याचे उत्तर काय असेल याचा अंदाज बांधणे अवघड नाही. पण या विज्ञानप्रेमापोटी नाही तरी राजकीय हिशेबांसाठी तरी आपण याबाबत सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारायला हवा. हा राजकीय हिशेब २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घोषणेचा आहे. जनुकीय सुधारित बियाण्यांशिवाय हे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन निश्चलनीकरणातून काळा पैसा दूर करण्याच्या ग्यानबाच्या अर्थशास्त्रासारखेच 'चिंतनीय'. शेतीखालची जमीन वाढणारी नाही, दरएकरी उत्पन्न आहे त्या स्थितीत घटणारेच, वर अतिवृष्टी वा दुष्काळासारख्या नैसर्गिक संकटांची टांगती तलवार. अशा वेळी आहे त्याच परिस्थितीत हे शेतीचे उत्पन्न दुप्पट होणार कसे याचे उत्तर फक्त बृहस्पतीलाच ठावे! तेव्हा या मुद्दय़ावर झाले तेवढे पुढेमागे पुरे. तांदळाबाबत निर्माण झालेल्या या संकटाच्या निमित्ताने जनुकीय वाणांचा मुद्दा कायमस्वरूपी निकालात काढायची संधी आहे.

# 'नम्र विनंती, आम्हाला गांजाची शेती करु द्या', चंद्रपुरातील शेतकऱ्याची सरकारकडे विचित्र मागणी, ग्रामसभेने अर्ज स्वीकारला, पण...

चंद्रपूर : राज्यासह देश आणि जगावर कोरोनाचं संकट आहे. या संकटामुळे अनेकांवर आर्थिक संकट कोसळलं. पण राज्यात आलेल्या आसमानी संकटामुळे शेतकऱ्यांचं आर्थिक कंबरडंच मोडलं आहे. अतिवृष्टीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत. सरकारने या शेतकऱ्यांना मदतीचं आश्वासन दिलंय. पण त्यांच्यापर्यंत जोपर्यंत मदत मिळेल तोपर्यंत काय? असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना सतावतोय. अशा परिस्थितीत उद्विग्नतेतून चंद्रपुरच्या एका शेतकऱ्याने सरकारकडे थेट गांज्याची शेती करण्यास अनुमती द्यावी, अशी विनंती केली आहे. शेतकऱ्याने ग्रामसभा, तहसीलदारांना याबाबतचा अर्ज देखील दिला आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात शेतकऱ्याच्या या मागणीची चर्चा आहे. शेतकऱ्याचं नेमकं म्हणणं काय? चंद्रपूर जिल्ह्यातील नूकसानग्रस्त शेतकऱ्याने सरकारला विचित्रच विनवणी केली आहे. आपल्या 2 एकर शेतीत सतत नुकसान होत असल्याने गांजा पिकविण्याची



परवानगी द्यावी. शेतकऱ्याच्या या मागणीमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. गोंडपिपरी तालुक्यातील डोंगरगाव येथील शेतकरी साईनाथ फुलमारे यांनी डोंगरगाव ग्रामसभेत यासाठी थेट अर्जच सादर केला आहे. गांजा शेती करु देण्याचा विनंती करणारा अर्ज त्याने शेतीच्या विपरीत परिस्थितीमूळे घेतला आहे. ग्रामसभेने अर्ज स्वीकारला, पण कायदेशीर बाजू तपासणार जिल्ह्यात सातत्याने पडत असलेल्या पावसामुळे सोयाबीन आणि धान शेती सडल्याचा या शेतकऱ्याचा दावा आहे. कुटुंब पालनपोषणासाठी शासनाकडून मदत मिळत नसल्याने गांजा शेतीची परवानगी त्याने मागितली आहे. तहसीलदार- कृषी विभाग आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याने हा विनंती अर्ज पाठविला आहे. ग्रामसभेने या अर्जासंदर्भात अर्ज स्वीकारत कायदेशीर बाजू तपासून प्रकरण निकाली काढू, अशी माहिती दिली आहे. गांजाच्या शेतीला देशात बंदी देशात गांजाच्या शेतीला बंदी आहे. अंमली पदार्थ आणि सामाजिक मुद्द्याच्या पार्श्वभूमीवर गांजाच्या शेतीला देशात बंदी आहे. पण राज्यास देशात बऱ्याचदा गांजाच्या शेती केल्याच्या बातम्या समोर येतात. गांजा प्रचंड किंमतीत विकला जातो. त्यामुळे आरोपींकडून गांजाच्या तस्करी केली जाते. त्याविरोधात पोलिसांकडून कठोर कारवाई केली जाते. काही दिवसांपूर्वी औरंगाबादच्या वैजापूर तालुक्यातील नालेगाव येथे एका शेतकऱ्याने तुरीच्या शेतात गांजा लावला होता. हा कारनामा त्याला चांगलाच महागात पडला होता. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तब्बल 157 किलो गांजा तसेच तब्बल 9 लाख रुपये जप्त केले होते. आर्थिक फायद्यासाठी गांजाची लागवड मोठा आर्थिक फायदा व्हावा यासाठी वैजापूरमधील एका शेतकऱ्याने चक्क तुरीच्या शेतात गांजा लावला होता. गांजाचे वितरण तसेच उत्पादनावर बंदी असूनदेखील या शेतकऱ्याने अवैध पद्धतीने गांजाची शेती केली होती. या कारनाम्याची गुप्त माहिती पोलिसांना समजली. नंतर पोलिसांनी कारवाई करून या शेतकऱ्याकडून तब्बल 157 किलो गांजा पकडला. तसेच 303 गांजाची झाडे हस्तगत करून नऊ लाख रुपयांपेक्षाही जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पैशांच्या हव्यासापोटी गांजा लागवड करणाऱ्या या आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'ती' देहव्यापार करायचीच, बहिणीलाही त्यात ढकललं, विरोध केल्याने संपवलं, 'त्या' कुजलेल्या मृतदेहाचं गूढ अखेर उकललं

रांची : मोठी बहीण आईसमान असते, असं म्हणतात. ती आपल्याला खूप जीव लावते. पण झारखंडमधून प्रचंड धक्कादायक घटना समोर आली आहे. झारखंडमध्ये मोठ्या बहिणीनेच आपल्या लहान बहिणीला जबरदस्ती देहविक्रीच्या व्यवसायत ढकललं, तिने विरोध केला असता कट रचून तिची हत्या केली, अशी धक्कादायक माहिती आता पोलिसांच्या तपासातून समोर आली आहे. विशेष म्हणजे झारखंड पोलीस गेल्या सात महिन्यांपासून तपास करत होते. अखेर तब्बल सात महिन्यांनी पोलिसांना या हत्येचा उलगडा करण्यात यश आलं आहे. झारखंड पोलिसांनी रविवारी (24 ऑक्टोबर) पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती दिली.

नेमकं प्रकरण काय?

झारखंड पोलिसांना सात महिन्यांपूर्वी मेदिनीनगर परिसरात एका तरुणीचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला होता. विशेष म्हणजे या तरुणीचा मृतदेह जमीनीत गाडलेला होता. पण तिचा पाय





बाहेर दिसल्याने परिसरात खळबळ उडाली. पोलिसांनी नंतर खोदून तिथून तरुणीचा मृतदेह बाहेर काढला होता. या तरुणीच्या मृत्यूमागील गूढ उकलण्यात पोलिसांना अखेर यश आलं आहे. पोलिसांनी केलेल्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. मृतक तरुणीची हत्या तिच्या सख्ख्या बहिणींनी आपल्या पती आणि प्रियकराच्या मदतीने केली होती, अशी माहिती उघड झाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी काही जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांकडून आरोपींना बेड्या

झारखंड पोलिसांनी या प्रकरणी मृतक तरुणीची मोठी बहीण राखी देवी (वय 30), रुपा देवी (वय 25), रुपाचा पती धनंजय अग्रवाल उर्फ नन्हकू (वय 30) आणि हमीदगंजला राहणारा आरोपी प्रताप कुमार सिंह उर्फ कारु यांना अटक केली आहे. तसेच या प्रकरणात नितीश नावाचा आरोपी फरार आहे. पोलीस त्याचा देखील शोध घेत आहेत. पोलिसांनी पत्रकार परिषद घेऊन या सर्व प्रकरणाची माहिती दिली आहे. पीडित तरुणीने सुरुवातीला आत्महत्या केली,

असा पोलिसांना अंदाज होता. पण मृतदेहावाचा शवविच्छेदन अहवाल समोर आल्यानंतर तपासाचा मार्ग बदलला.

पोलिसांनी हत्येचा उलगडा कसा केला?

आरोपींनी तरुणीची 21 मार्च 2021 रोजी हत्या केली होती. त्यानंतर त्यांनी तरुणीचा मृतदेह जमिनीत गाडला होता. पण 26 मार्चला मृतदेहाचा पाय काही स्थानिकांना दिसला होता. त्यामुळे पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली होती. त्यानंतर 30 मार्चला मृतक तरुणीची बहीण रंभा हिने पोलीस ठाणे गाठत आपली ओळख सांगत पीडितेने आत्महत्या केल्याचं सांगितलं होतं.

सख्ख्या बहिणीनेच उकिरड्यात ढकललं

मृतक तरुणीला चार बहिणी आहेत. पाच बहिणींपैकी ती चौथ्या नंबरची बहीण होती. त्यांच्या आई-वडिलांचं निधन झालंय.

मृतक तरुणी ही आपली मोठी बहीण राखीच्या घरी राहत होती. राखी ही देहविक्रीचा धंदा करायची. या कामात तिला रुपाचा पती धनंजय सहकार्य करायचा.

विशेष म्हणजे राखी आणि धनंजय हे मृतक तरुणीकडून जबरदस्ती देहविक्री व्यावसाय करवून घ्यायचे. तिला तिच्या संमतीशिवाय ग्राहकांकडे पाठवायचे. या दरम्यान तिचं एका तरुणावर प्रेम जडलं होतं. ती त्या तरुणासोबत लग्न करण्यास इच्छूक होती. पण तिची बहीण राखीला ते मान्य नव्हतं.

## शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरणी साताऱ्याच्या पैलवानाला अटक



पुणे : पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शिवाजीराव भोसले सहकारी बँक गैरव्यवहार प्रकरणी आणखी एकाला अटक केली. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या प्रकरणी सातारा येथून एका पैलावानाला अटक केली. अमर श्रीरंग जाधव (वय ६२, रा. सातारा) असे अटक करण्यात आलेल्या पैलवानाचे नाव आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.शिवाजीराव भोसले बँक घोटाळा प्रकरणी पुणे पोलिसांनी यापूर्वी आमदार अनिल शिवाजीराव भोसलेसह 8 आरोपींना अटक केली आहे. अमर जाधव हा त्यातील नववा आरोपी आहे. आतापर्यंत या बँकेत 496 कोटी रुपयांहून अधिक किमतीचा घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. आतापर्यंतच्या तपासात अटक केलेल्या आरोपींनी संगणमत करून बोगस कर्जदारांच्या नावाने बनावट कागदपत्र तयार केली. या कागदपत्रांच्या आधारे बँकेतील ठेवीदारांचे पैसे कर्ज स्वरूपात घेऊन त्याचा अपहार केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट चारकडून या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असताना आरोपी अमर जाधव याने ८० कोटींचे बनावट चेक डिसकाउंटिग केल्याचे समोर आले. त्याच्यानंतर युनिट चारच्या पथकातील काही कर्मचाऱ्यांनी सातारा येथून त्याला अटक केली. आता या संपूर्ण गैरव्यवहाराबद्दल त्याच्याकडे सखोल चौकशी केली जात आहे. त्याच्या चौकशीतून आणखी काही आरोपींची नावे समोर येण्याची शक्यता आहे.

## कल्याणमध्ये जिथे नो पार्किंग तिथे पोलिसच करतात गाड्या पार्क



कल्याण - कल्याण स्टेशन परिसरात स्मार्ट सिटीचे काम सुरु आहे. स्टेशन परिसरात नो पार्किंग आहे. त्याच ठिकाणी पोलिस त्यंच्या दुचाकी उभ्या करतात. पोलिसांनी बेशिस्तपणो रस्त्याच्या कडेला उभ्या केल्या गाडय़ांच्या विरोधात वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली आहे. तसेच नो पार्किंगमध्ये गाडय़ा उभ्या करु नये असे आवाहन केले आहे. जवळपास १०० गाडय़ांच्या विरोधात पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांनी ही कारवाई करुन पोलिसांच्या बेशिस्तीला चांगलाच दणका दिला आहे.कल्याण डोंबिवली महापालिकेकडून स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत स्टेशन परिसराचा विकास केला जात आहे. या विकास कामाला सुरुवात करण्यात आली आहे. स्टेशन परिसरातील दीपक हॉटेलपासून साधना हॉटेलर्पयत हे विकासाचे काम सुरु झालेले आहे. रस्त्याच्या मधोमध हे काम सुरु आहे. त्सासाठी मोठी यंत्र सामग्री लावली आहे. त्यामुळे वाहतूक काही प्रमाणात वळवून काही थोडी जागा लहान आकारच्या गाडय़ा पास होण्यासाठी सोडण्यात आली आहे. कल्याणमध्ये आसपासच्या भागातून जवळपास 8क्क् पेक्षाजास्त पोलिस, स रकारी कर्मचारी तसेच कल्याण न्यायालय, रेल्वे न्यायालय, तहसील कार्यालयात काम करणारा कर्मचारी वर्ग येतो. त्यांच्या दुचाकी स्टेशन परिसरात पार्किग केल्या जातात. त्यात जास्त गाडय़ांची संख्या पोलिसांची आहे. स्टेशन परिसरता पार्किग केलेल्या पोलिसांच्या गाडय़ांच्या विरोधात वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुखदेव पाटील यांनी कारवाई केली आहे. ई चलानची कारवाई करण्यात आली आहे. त्यात वकिलांच्या गाडय़ांचाही समावेश आहे. या कारवाई पश्चात बेशिस्तपणो गाडय़ा उभ्या करु नये. यासाठिकाणी स्मार्ट सिटीचे काम सुरु आहे. वाहतूकीस अडथळा निर्माण होणार नाही असे आवाहन वरिष्ठ पोलिस निरिक्षक पाटील यांनी केले आहे.स्मार्ट सिटी प्रकल्पांच्या कामामुळे दिलीप कपोते वाहन तळ पाडण्यात आला. त्याठिकाणी नव्याने वाहनतळ उभारला जाणार आहे. तसेच स्कायवॉकचे पाडकाम सुरु आहे. त्यामुळे वाहतूकीस अडथळा होणा:या पार्किगच्या विरोधात ही कारवाई सुरु केली आहे.

## नागपुरातील प्रसिद्ध नगरसेवकाच्या घरी धाडसी चोरी, घरातील नोकर झोपले असताना चोरट्यांनी 32 लाखांचे दागिने लांबवले



नागपूर : नागपुरात प्रसिद्ध नगरसेवकाच्या घरी चोरीची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली. चोरट्यांनी जवळपास 32 लाख रुपयांचे मौल्यवान दागिने लांबविले आहेत. विशेष म्हणजे घरात नोकरचाकर आणि इतर कुटुंबिय असताना चोरट्यांनी एवढ्या मोठ्या रकमेची धाडसी चोरी केली आहे. त्यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे. इतक्या मोठ्या व्यक्तीच्या घरात चोरी होऊ शकते तर मग सर्वसामान्यांचं काय? असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जातोय. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. पण या घटनेमुळे स्थानिकांकडून पोलिसांच्याही कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

नेमकं काय घडलं?

नागपुरातील प्रसिद्ध नगरसेवक संदीप गवई यांचं सेमिनरी हिल्स परिसरात मोठं घर आहे. त्यांच्या घरातील एका बेडरुममध्ये एक 70 किलो वजनाची तिजोरी होती. त्या तिजोरीत दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू होत्या. जवळपास 32 लाख रुपयांचा ऐवज त्या तिजोरीत होता. संदीप गवई काही कामानिमित्ताने आपल्या पत्नीसह मुंबईत आले होते. याच दरम्यान चोरट्यांनी घरात शिरुन हात साफ केला. मुंबईहून घरी पोहोचल्यानंतर गवई यांना बेडरुममध्ये तिजोरी दिसली नाही. गवई आणि त्यांच्या पत्नीने शोधाशोध केली. पण ती तिजोरी घरात सापडत नव्हती. त्यामुळे त्यांना धक्काच बसला. आपल्या घरातील दागिन्यांची तिजोरीसह चोरी झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

पोलिसांचा तपास सुरु

विशेष म्हणजे संबंधित चोरीची घटना ज्या रात्री घडली त्यावेळी घरात घरातील इतर सदस्य आणि नोकरही होते. मात्र रात्रीच्या वेळी हा सगळा प्रकार घडला आणि चोरट्यांनी कुठलीही तोडफोड न केल्याने कोणाच्याही लक्षात ही बाब आली नाही. दरम्यान या घटनेमुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

चोरट्यांनी बरोबर संदीप गवई यांच्या बेडरुममधील तिजोरीच कशी लांबवली? त्यांनी घरातील इतर ठिकाणी काहीच शोधाशोध का नाही केली? घरात असणाऱ्यांना चोर घरातून 70 किलो वजनाची तिजोरी दागिन्यांसह घेऊन जाण्यापर्यंत काहीच आवाज आला नसेल? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

## आई-बहिणीला दिलेल्या त्रासाचा वचपा, पॅरोलवर सुटलेल्या बापाची मुलाकडून हत्या




बुलडाणा : हत्या प्रकरणात शिक्षा भोगत असलेला बाप पॅरोलवर सुटून आल्यानंतर मुलाने त्याची हत्या केली. दारु पिण्यासाठी पैसे मागून आई आणि बहिणींना त्रास देत असल्याच्या रागातून मुलाने बापाचा खून केल्याचा आरोप आहे. ही घटना बुलडाणा जिल्ह्यातील वरवट बकाल येथे घडली आहे. या प्रकरणी घटनास्थळावरून श्वानाने दाखवलेला मार्ग आणि पुरावे पाहता पोलिसांनी आरोपी मुलगा आणि त्याच्या मित्रावर गुन्हा दाखल करून अटक केली आहे. काय आहे प्रकरण? बुलडाणा जिल्ह्याच्या संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल येथील संगीत इंगळे या व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. संग्रामपूर ते वरवट मार्गावर मधुकर बकाल यांच्या शेताजवळ पहाटे तामगाव पोलिस हे गस्तीवर असताना त्यांना मृतदेह सापडला होता. मृतदेहाचा पंचनामा करुन ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले होते. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी दिवसभर चौकशी केली असता दारू पिऊन कुटुंबाला त्रास देणाऱ्या वडिलांचा मुलाने साथीदारासोबत तीक्ष्ण हत्याराने वार करून खून केल्याचे समोर आले. तात्काळ या घटनेची तपास चक्र फिरवले असता श्वान पथक पाचारण करण्यात आले. मुलाची कबुली मयत संगीत राजाराम इंगळे (वय 49) याचा मुलगा विपुल संगीत इंगळे याला पोलिसांनी ताब्यात घेत विचारपूस केली असता माझा बाप दारु पिऊन मारहाण करून त्रास देत होता, याच त्रासाला कंटाळून लाकडी दांड्याने मारुन त्याला ठार केले. मृतदेह एका चादरीमध्ये गुंडाळवून साथीदार राजेश भाटकर याच्या मदतीने मोटारसायकलच्या साहाय्याने गावाबाहेर नेऊन फेकून दिल्याचे त्याने कबूल केले. पोलिसांनी दोघांवरही गुन्हा दाखल करत अटक केली आहे. संगीत राजाराम इंगळे याने दहा वर्षांपूर्वी गावातीलच व्यक्तीचा खून केला होता. हत्या प्रकरणात तेव्हापासून संगीत हा जेलमध्ये शिक्षा भोगत होता. मात्र अलिकडे तो पॅरोलवर काही दिवसांसाठी घरी आला होता.

## तुळजाभवानीची पूजा, अभिषेक करण्याचे आमिष दाखवत भाविकांची ऑनलाईन लूट, 4 वेबसाईट चालकांवर गुन्हा

उस्मानाबाद : बोगस वेबसाईटवरुन तुळजाभवानी देवीच्या भाविकांची फसवणूक करण्यात येत असल्याचा प्रकार पुढे आला आहे. याप्रकरणी 4 वेबसाईट चालकांवर तुळजापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या वेबसाईटवरुन भक्तांची आर्थिक लूट करण्यात येत होती.

तुळजाभवानी मंदिर संस्थान आणि तुळजाभवानी देवीच्या नावाने बोगस वेबसाईट काढून भाविकांची विविध पुजा करण्याच्या नावाने आर्थिक फसवणूक करणाऱ्या 4 वेबसाईटच्या चालकांवर तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांच्या आदेशानुसार मंदिर संस्थानचे सहायक व्यवस्थापक अनिल चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तुळजाभवानी देवीच्या भाविकांची आर्थिक लूट केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर जिल्हाधिकारी दिवेगावकर यांनी चौकशी आणि कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, योगेश खरमाटे उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त सदस्य श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूर, रोहन शिंदे तहसीलदार तथा व्यवस्थापक प्रशासन यांनी चौकशी केली.

तुळजाभवानी मंदिर संस्थानची अधिकृत वेबसाईट www.shrituljabhavani.org असताना बोगस वेबसाईट तयार करुन काही मंडळी भाविकांकडुन देवीच्या विविध पूजा आणि विधी करण्याच्या नावाखाली आर्थिक रक्कम ऑनलाईन घेत होते.




अज्ञात लोकांनी www.tuljabhawanipujari.com, www.tuljabhwanimandir.org, www.shrituljabhavani.com, wwww.epuja.co.in या चार वेबसाईट सुरु करुन भाविकांची लूट केली असल्याचे स्पष्ट झाले, विशेष म्हणजे हा सर्व प्रकार तुळजाभवानी नवरात्र काळात राजरोस सुरु होता. याबाबत बाळासाहेब सुभेदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली होती. या बोगस वेबसाईटवरुन तुळजाभवानी देवीच्या अभिषेक, अलंकार महापूजा, खण-नारळ ओटी पूजा, जागरण गोंधळ, अन्नदान आशा पूजा करण्याचे अमिश दाखवुन ऑनलाईन पैसे जमा करून घेतले जात होते. तुळजापूर पोलीस ठाण्यात कलम 420 फसवणूक, माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2008 चे कलम 66 सी आणि डी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ज्या भक्तांनी यासह अन्य बोगस वेबसाईटवर दिलेल्या आमिषाला बळी पडून पूजा आणि विधीसाठी पैसे ट्रान्सफर केले आहेत त्यांनी मंदिर संस्थानशी संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्र महोत्सवात तुळजाभवानी देवीचे, एक लाख 16 हजार भाविकांनी घेतले ई-दर्शन कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी तुळजापूर येथील श्री. तुळजाभवानी देवीजींच्या दर्शनासाठी ई-दर्शन पासची सुविधा मंदिर संस्थानने उपलब्ध करुन दिली होती. त्याचा यंदाच्या नवरात्र महोत्सव काळात एक लाख 16 हजार भाविकांनी लाभ घेतला आहे. या ई-दर्शन सेवेचाही सेवा सुरु झाल्यापासून 30 लाख 59 हजार 742 भाविकांनी लाभ घेतला आहे. महाराष्ट्राबरोबरच देशातील विविध राज्यांतील भाविकांनी ई-दर्शन पासचा लाभ घेतला आहेतच, त्याच बरोबर विदेशातील भाविकांनीही या सेवेचा लाभ घेतला आहे. तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर कोरोना लसीचे दोन डोस (दोन लस) घेतलेल्या भाविकांना श्री. देविजींच्या दर्शनासाठी मंदिरात प्रवेश देण्यात आलेला होता. तसेच 65 वर्षावरिल ज्येष्ठ नागरिक, दुर्धर आजारग्रस्त, गरोदर स्त्रिया आणि दहा वर्षाखालील बालकांना प्रवेश बंद होता.त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी जास्तीत जास्त नागरिकांना ऑनलाईन ई-दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले होते.

सध्याचे युग हे माहिती तंत्राज्ञानाचे युग आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग हा अतीशय अफाट आहे, श्री.दिवेगावकर यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (NIC) मदतीने जिल्ह्यांच्या संकेत स्थळावरुन जनतेसाठी विविध विभागाच्या ऑनलाईन सेवा पुरवीण्यात जिल्हा प्रशासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे.

## काका खाऊला पैसे देतायेत समजून 7 वर्षांची चिमुरडी गेली पुढे, झाली भयंकर अवस्था



नवी दिल्ली, देशाच्या राजधानीत माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार समोर आला आहे. दिल्लीतील रंजीत नगर भागात एका नराधमाने 7 वर्षांच्या चिमुरडीला 10 रुपयांचा आमिष दाखवून स्वत:जवळ बोलावलं आणि तिच्यावर बलात्कार केला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेत दिल्ली महिला आयोगाने पोलिसांना नोटीस जारी केलं आहे. आयोगाकडून मिळालेल्या माहितीनुसार, आयोगाला 22 ऑक्टोबर रोजी दिल्लीतील रंजीत नगर भागात एका मुलीवर बलात्कार झाल्याची माहिती मिळाली होती. ज्यानुसार 7 वर्षांत्या एका चिमुरडीवर बलात्कार करण्यात आला. या नराधमाने मुलीला 10 रुपयांचं आमिष दिलं होतं. यानंतर त्यांने चिमुरडीवर बलात्कार केला, या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेनंतर पीडितेचे वडिलांनी तिला रुग्णालयात नेलं. तिला खूप जास्त रक्तस्त्राव झाला असल्याने तातडीने तिला दुसऱ्या रुग्णालयात रेफर करण्यात आलं. या प्रकरणात आयोगाच्या टीमने मुलीवर झालेल्या अत्याचारावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## नाशिकचा तरुण इगतपुरीमधून बेपत्ता; मित्राला भेटल्यानंतर दिसलाच नाही

इगतपुरीः नाशिकचा तरुण इगपुरीमधून बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. इगतपुरी तालुक्यातील गोंदे दुमाला येथील मित्राला भेटायला गेलेला निखिल अचानक गायब झाला असून, त्याल्या शोधून थकलेल्या आई-वडिलांनी अखेर वाडीवऱ्हे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, निखिल नाना केदारे (वय 23) हा तरुण नाशिकमधल्या इंदिरानगर भागातील रथचक्र सोसायटीत आपल्या आई-वडिलांसह रहायचा. मात्र, निखिल 21 ऑक्टोबर रोजी इगतपुरी तालुक्यातील गोंदे दुमाला येथील सिंधू नरवाडे या मित्राला भेटायला गेला. त्याची व त्या मित्राची भेट झाली. त्यानंतर तो कोणाला काहीही न सांगता निघून गेला. मात्र, अचानक तो कुठे गेला की,



त्याचे कोणी अपहरण केले, याची चिंता आई-वडिलांना आहे. निखिलची आई मंगला नाना केदारे (वय 50) यांनी वाडीवऱ्हे पोलीस ठाण्यात मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दिली आहे. निखिलची शरीरयष्टी सडपातळ आहे. त्याची उंची 5 फूट 5 इंच असून रंगाने गोरा, चेहरा गोल, नाक सरळ आहे. तो बेपत्ता झाला त्या दिवशी त्याने अंगात काळा शर्ट व पांढरी पँट, पांढरा बूट घातला होता. त्याच्या कानात काळ्या रंगाची बाळी आहे. या तरुणाबाबत कोणाला काही माहिती असल्यास वाडीवऱ्हे पोलीस ठाणे अथवा नजीकच्या पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन वाडीवऱ्हेचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक देविदास फड यांनी केले आहे. पोलिसांनीही त्याचा तपास सुरू केला आहे.

फटाके फोडणारा मुलगा गंभीर जखमी फटाके फोडणे एका सात वर्षांच्या मुलाच्या जीवावर बेतले असून, त्याच्यावर आता नाशिक जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नाशिकच्या इंदिरानगर मधील पांडवनगरीत राहणाऱ्या शौर्य लाखोडे हा सात वर्षांचा मुलगा मित्रांसोबत फटाके फोडत होता. त्यांची रोजप्रमाणेच धमाल मस्ती सुरू होती. ते फटाके पेटवायचे आणि बाजूला फेकायचे. मोठा आवाज व्हायचा. त्यानंतर ही मित्रमंडळी टाळ्या वाजवायची.

## दीडशहाण्या बाबाचे 14 महिन्यांच्या बाळावर घरीच चुकीचे उपचार; मुलीचा मृत्यू अन् कसाई बापाला बेड्या!

नाशिकः अति शहाणा त्याचा त्याचा बैल रिकामा, अशी म्हण आपल्याकडे आहे. अशाच एका दीडशहाण्याने बापाने आपल्या अवघ्या 14 महिन्यांच्या मुलीवर घरीच उपचार केले. त्यामुळे त्या बाळाचा मृत्यू झाल्याची हृदद्रावक घटना नाशिकमध्ये घडली. याप्रकरणी बाळाच्या आईच्या तक्रारीवरून हेमंत शेटे (रा. मखमलाबादरोड, पंचवटी) याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. प्रत्येकाने डोळ्यात तेल घालून वाचावी अशी ही बातमी. कारण ही तितकीच भयंकर, धडा देणारी आहे. अतिशय विचित्र आणि बाळाचा हकनाक बळी घेण्याऱ्या या प्रकरणाची माहिती काळजाला चरे पाडते. हे वाचून कोणीही म्हणेल, शिक्षण घेऊन उपयोग नसतो. तर समज आणि अक्कल असावी लागते. त्याचे झाले असे की, मखमलाबाद रोडवरील पंचवटीतल्या शेटे कुटुंबाच्या



अवघ्या चौदा महिन्यांच्या चिमुकलीवर एका रुग्णालयात उपचार सुरू होते. विशेष म्हणजे हे बाळ उपचाराला चांगला प्रतिसाद देत होते. त्याची प्रकृती दिवसेंदिवस सुधारत होती. हे पाहून मुलीच्या बाबाने बाळाला घरी नेण्याची परवानगी मागितली. मात्र, हॉस्पिटलमधील अधिकाऱ्यांनी सध्या उपचार सुरू आहेत. घरी नेऊ नका असे सांगितले. शेवटी जर तुम्हाला घरी न्यायचे असेल, तर स्वतःच्या जबाबदारीवर न्या, असा इशाराही दिला. मात्र, असा धोक्याचा इशारा देऊनही ऐकल तो कसला शहाणा. त्यामुळे शेटे याने शेवटी आपलेच म्हणणे खरे केले. आम्ही आमच्या बाळाला दुसऱ्या रुग्णालयात दाखल करणार आहोत, अशी थाप मारली. त्यानंतर डिस्चार्ज मिळाला. बाळाला घरी आणण्यात आले. खरे तर बाळाला घरी आणण्यासाठी शेटेच्या पत्नी व आईंचा विरोध होता. मात्र, शेटेचा अति शहाणपणा त्यांच्यावरही भारी पडला. म्हणे, मला सिव्हिलमध्ये कामाचा अनुभव... आपल्या बाळावर घरी उपचार करायला शेटेच्या पत्नीने विरोध दर्शवला. तेव्हा शेटेने आपल्या कुटुंबाला सांगितले की, मला सिव्हिल हॉस्पिटलमध्ये काम केल्याचा अनुभव आहे. मी एका फार्मा कंपनीत कामाला आहे. त्यामुळे काय उपचार करायचे, ते मला माहित आहे, असे म्हणत त्याने घरातील इतर मंडळींचे म्हणणे अक्षरशः उडवून लावले. त्याने आपली आई व पत्नी या दोघांनाही जुमानेले नाही आणि हट्ट करून बाळाला घरी आणलेच.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898